Government of Maharashtra
State Council of Educational Research & Training, Maharashtra SadashivPeth,
Kumthekar Road,
Pune 411030
Tel. No. : (020)24476938,24475571
Website : www.maa.ac.in

महाराष्ट्र शासन
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११०३०
दु.क्र.(०२०)२४४७६९३८,२४४७५५७१
ईमेल: englishlangdept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/इंग्रजी./wattpadwritingcontest /२०२०-२०२१ /२६२९ दिनांक :२१/१२/२०२०

प्रति,

- शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक,
  (औरंगाबाद, ठाणे, नाशिक, नागपूर, रायगड, पुणे).
- प्रशासन अधिकारी, महानगरपालिका,
  (औरंगाबाद, ठाणे, नाशिक, नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड).
- शिक्षण निरीक्षक,
  मुंबई, नवी मुंबई (दक्षिण/पश्चिम/उत्तर, महानगरपालिका).

विषय:- राज्यातील इयत्ता ७ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी Wattpad (social story telling platform) आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सृजनात्मक लेखन स्पर्धेबाबत...

आपणास विदितच आहे की, कोरोना संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे आणि त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सबंध राज्यातील शाळा व महाविद्यालये सन २०१९-२०२० या संपूर्ण शैक्षणिक वर्षामध्ये सद्यस्थितीत बंद आहेत. या संपूर्ण वर्षामध्ये औपचारिकरीत्या शिक्षण जरी बंद राहिले असले तरी सर्व विद्यार्थ्यांचे अनौपचारिकरीत्या शिक्षण सुरु राहावे, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता शालेय शिक्षण विभागामार्फत ऑनलाईन व दूरचित्रवाणी या माध्यमांचा उपयोग करून अनेकविध प्रयत्न केले जात आहेत. याकरिता शासनाच्या बरोबरीने अनेक शासकीय व स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

कोरोना संसर्ग प्रादुर्भाव असताना देखील, शाळा बंद असल्या तरीही मुलांच्या अभिव्यक्तीला चालना मिळावी, त्यांच्या कल्पक वृत्तीला वाव मिळावा आणि एकूणच त्यांचे व्यक्तिमत्व विकासाला मदत व्हावी या हेतूने **Times of India Network चा Times bridge हा एक विभाग, Wattpad (social story telling platform) आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील इयत्ता ७ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांकरिता गेल्या आठ महिन्याच्या काळातील शाळा व महाविद्यालये बंद असताना त्यांचे व्यक्तिगत अनुभव त्यांनी सृजनात्मक लेखनातून व्यक्त होण्यासाठी एका नाविन्यपूर्ण सृजनात्मक लेखन स्पर्धेचे आयोजन करण्याचे नियोजित केलेले आहे.

यासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील शाळा व विद्यालयामधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे. प्रस्तुत स्पर्धेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे असून आपल्या

स्तरावरून संबधित शाळा, क्षेत्रीय अधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करण्यात यावे आणि अधिकाधिक विद्यार्थी स्पर्धेमध्ये सहभागी होतील यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

- **स्पर्धेबाबतचा तपशील:**
  - **पार्श्वभूमी:-** मुलांची अभिव्यक्ती, कल्पक-वृत्तीला वाव देण्यासाठी एकूणच त्यांचे व्यक्तिमत्व विकासाला मदत मिळावी.
  - **सहभाग पात्रता:-** सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमधील विद्यार्थी.
  - **वयोमर्यादा:-** वयवर्षे १३ ते १८
  - **स्पर्धा गट, विषय व शब्द मर्यादा:-**

    १. इयत्ता ७ वी व ८ वी - *"Story of Covid hero that I have seen"*
    "मी अनुभवलेला कोविड योद्धा"
    "मैने देखा हुवा कोविड योद्धा"
    (२०० ते २५० शब्द)

    २. इयत्ता ९ वी व १० वी - *" What do you think of the year 2020 and how can 2021 be better "*
    " २०२० सालामधील माझे अनुभव आणि येणारे २०२१ साल अधिक चांगले होण्यासाठीच्या माझ्या कल्पना "
    " वर्ष २०२० के मेरे अनुभव और आनेवाला साल २०२१ और बेहतर होणे के बारे में मेरी कल्पनाए "
    (३०० ते ३५० शब्द)

    ३. इयत्ता ११ वी व १२ वी - *"What is your vision of India for the year 2030?*
    " माझ्या स्वप्नातील २०३० सालामधील भारत "
    " मेरे सपनो का २०३० साल का भारत "
    (४०० ते ५०० शब्द)

  - **भाषा व लिखाण माध्यम:-** इंग्रजी, मराठी व हिंदी पैकी एका भाषेत संगणकाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी स्वतःचे Wattpad (social story telling platform) मध्ये स्वतःचे account तयार करून त्यातील comment section मध्ये आपली गोष्ट/निबंध स्वतः type करून लिहायचे आहे.
  - **बक्षिसे:-** विजेत्या मुलांचे लेखन साहित्यास Times of India Network च्या वृत्तपत्रातून प्रसिद्धी दिली जाईल आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभागाचे डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल.
  - **स्पर्धेत सहभाग व नाव नोंदणी:-**

    १. Wattpad (social story telling platform) द्वारा राज्यातील विद्यार्थ्यांसाठी एक platform तयार केला आहे, जिथे स्पर्धेबाबतची सर्व नियमावली व

आवश्यक प्रक्रियेविषयी माहिती उपलब्ध आहे.

२. पुढे दिलेल्या लिंक चा उपयोग करून विद्यार्थ्यांनी आपले Wattpad (social story telling platform) मध्ये स्वतःचे account तयार करावे आणि त्यातील comment section मध्ये आपली गोष्ट/निबंध लिहावा.

- ✓ https://www.wattpad.com/user/MaharashtraGovt
  (Profile Link – भाषा निहाय पुढीलप्रमाणे ३ लिंक आहेत)
- ✓ (English) https://www.wattpad.com/996825604-writing-contest-english
- ✓ (Hindi) https://www.wattpad.com/996840905-writing-contest
- ✓ (Marathi) https://www.wattpad.com/996843192-writing-contest

➢ **कालमर्यादा:-** स्पर्धेस सुरुवात शुक्रवार दिनांक २५/१२/२०२०
स्पर्धेचा अंतिम दिन रविवार दिनांक १७/०१/२०२१
परीक्षण कालावधी दिनांक १८/०१/२०२१ ते २४/०१/२०२१
निकाल घोषित दिनांक २६/०१/२०२१

तरी या स्पर्धेची कार्यवाही सुरळीतपणे व्हावी आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा या अनुषंगाने यथोचित कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल प्रस्तुत कार्यालयास सत्वर सादर करण्यात यावा.

(राहुल द्विवेदी भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर

- मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मा. आयुक्त (शिक्षण), आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

- विभागीय उपसंचालक, (औरंगाबाद, मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे)
- प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद.
- प्राचार्य, जि.शि.प्र.सं. (औरंगाबाद, मुंबई, रायगड, नाशिक, नागपूर, पुणे)
- आय. टी. विभाग, प्रस्तुत कार्यालय